Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar -431004
Maharashtra (India)
**NAAC Re-accredited A+ Grade**
Telephone (0240) 2403200
Office PBX : (0240) 2403399/400
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे अ+ दर्जा

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सदर्भः परीक्षा/समन्वय/मार्च-एप्रिल-२५/२०२४-२५/ ९९५ दि. ०१.०४.२०२५

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

**विषयः** भारतीय राज्यघटना **(Constitution of India)** या विषयाच्या परीक्षेबाबत.
**संदर्भः** शैक्षणिक विभागाचे पत्र क्र. SU/Con./I Yr/Cur/2022/7416-25 दि. २८.०१.२०२१.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी Constitution of India हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. **त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२५ च्या सुरु होणाऱ्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी भारतीय राज्यघटना (Constitution of India) या विषयाची परीक्षा दि.०५.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत घेण्यात येणार आहे.**

सदरील परीक्षा ही ज्या त्या महाविद्यालयात (Home Center) होणार असल्यामुळे सर्व संबंधीत महाविद्यालयांनी QPDS ची माहिती भरावी त्या शिवाय प्रश्न पत्रिका डाऊनलोड करता येणार नाही व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू शकतात म्हणून कृपया QPDS ची माहिती सर्व सबंधीत महाविद्यालयांनी भरुन घ्यावी. तसेच सदर परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपत्रिका ह्या महाविद्यालय स्थरावर वापरण्यात याव्यात.

सदर परीक्षा संपल्यानंतर सर्व उत्तरपत्रिका जमा करुन त्या आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयाच्या अध्यापकाकडून तपासून घ्याव्यात व त्यांच्या प्राप्त गुणांची यादी (बैठक क्रमांक प्राप्त गुण) या कार्यालयास १० दिवसात सादर करावी. संबंधीत विषयाची उत्तरपत्रिका **Answer Key** सदर विषयाची परीक्षा संपल्यानंतर त्याच किंवा दुसऱ्या दिवशी विद्यापीठामार्फत **online** पध्दतीने आपणास विद्यापीठाच्या **https://bamua.digitaluniveristy.ac** वर लपलब्ध करुन देण्यात येईल.

तरी सर्व संबंधीतांनी याची नोंद घेवून सदर परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार आवश्यक असणारी आसन/बैठक व्यवस्था तयार ठेवावी व सदरबाब सर्व विद्यार्थी, अध्यापक व पालक यांचे निदर्शनास आणून द्यावी तसेच सदर परीक्षेपासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**